MHRG170037452019

# नियमित दिवाणी अपील क्रमांक ५०/२०१९

## निशाणी क्र. ८० वरील आदेश

१. सदर अर्ज अर्जदार/प्रस्तावित अपिलार्थी क्र.७/१ ते ७/३ हे मयत मुळ अपिलार्थी क्र.७ यांचे वारस असल्याने त्यांना प्रस्तुत अपिलात अभिलेखावर सामील करणेसाठी सादर केला आहे.

२. अर्ज कथन थोडक्यात असे की, मुळ अपिलार्थी क्र.७ हे दिनांक २५/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांचे वारस प्रस्तावित अपिलार्थी क्र.७/१ ते ७/३ यांना अपिलात सामील करणेसाठी दाखल केलेला अर्ज मुदतीत असून तो मंजूर करणेची विनंती केली.

३. सदर अर्जावर उत्तरार्थी यांनी म्हणणे दाखल करुन योग्य ते आदेश करणेची, तसेच अर्ज मंजूर करणेस त्यांची कोणतीही हरकत नसल्याचे सांगितले.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखावरील कागदपत्रे पाहिली. उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकला.

५. मुळ अपिलार्थी क्र.७ हे दिनांक २५/१०/२०२४ रोजी मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत नि.८३ च्या यादीसोबत दाखल केली आहे. सदर मयत मुळ अपिलार्थी क्र.७ यांचे प्रस्तावित अपिलार्थी क्र. ७/१ ते ७/३ हे वारस असल्याचे अर्जात नमूद करुन त्याच्या पुष्टयर्थ प्रतिज्ञापत्र दाखल केले आहे. त्यामुळे सदर अपील गुणवत्तेवर चालणेकरिता अर्जदार यांना मयत अपिलार्थी क्र.७ यांचे वारस म्हणून अपिलामध्ये सामील करुन घेणे न्यायोचित ठरेल. त्यामुळे मी

खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज नि.८० मंजूर करणेत येत आहे.

२. मुळ अपिलार्थी क्र.७ चे वारस अभिलेखावर घेणेस परवानगी देणेत येते व त्यानुसार प्रस्तावीत अपिलार्थी यांनी सदर आदेशापासून १४ दिवसांत अपिल मेमोमध्ये योग्य ती दुरुस्ती करावी.

SANTOSH RAMU CHAVAN
Digitally signed by SANTOSH RAMU CHAVAN
Date: 2025.04.01 17:22:14 +0530

**पनवेल.** **(संतोष रा. चव्हाण)**

**दिनांक ०१/०४/२०२५** **जिल्हा न्यायाधीश–४,**

**पनवेल–रायगड.**